भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ 53AA 442438

अनुक्रमांक ....१२१६.... दिनांक ....११६।२०२३.... रुपये ....१००....

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे ....करार....

मुंबई मुद्रांक अधिनियम,१९५८ चे अनुच्छेद क्र. ....................

मुद्रांक वापरणाऱ्याचे संपुर्ण नांव ....भवरलाल कन्हैयालाल गौड....

संपुर्ण पत्ता ....बारामती....

दुसरे व्यक्तीचे संपुर्ण नांव ....२३....

पत्ता ....................

सही स्वाक्षरी

श्री.ग.कृ.जवंजाळ

मुद्रांक विक्रेता परवाना क्रमांक-२२०३००१

पत्ता - बारामती परवान्याची मुदत ३१/३/२०२४

23 MAY 2023

उप कोषागार अधिकारी, बारामती

# क रा र ना मा

## विद्यार्थीनी वसतिगृह मेस चालविण्याचा करारनामा

मा.श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर)
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि.पुणे

करार लिहून घेणार

श्री. भंवरलाल कन्हैयालाल गौड
महादेव भोजनालय, बारामती
ता. बारामती जि. पुणे

करार लिहून देणार

...२...

कारणे करारनामा लिहून देतो की, बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारातील विद्यार्थीनी वसतीगृहातील मेस विद्यार्थीनीच्या सोयीसाठी चालविण्याकरिता मी मागणी केल्यावरुन खालील अटींवर आपण मला ती देत आहात. त्या अटी पुढीलप्रमाणे आहेत व त्या मला मान्य आहेत.

१. **सदर मेस दि. ०१/०७/२०२३ ते ३१/०५/२०२४ अखेर (म्हणजेच ११ महिन्यांकरिता) चालविण्यांस दिलेली आहे.**

२. सदर मुदतीकरिता जागा भाडे विद्यार्थी मेस दरमहा रु. १५,०००/–(रुपये पंधरा हजार फक्त) ठरले आहे. भाडे त्याच महिन्याच्या सात तारखेपर्यत संस्थेकडे जमा करावयाचे आहे. तसेच प्रत्यक्ष येणारे लाईट बील मी स्वतः भरेन डिपॉझिट रू ५०,०००/– (अक्षरी रू. पन्नास हजार फक्त) या पूर्वी संस्थेकडे जमा केले आहे. पाणी पुरवठयाबाबत वार्षिक रू.२०००/– संस्थेकडे जमा करेन.

३. मेस चालू करण्यापूर्वी मी व्यवसाय नोंदणी, नगरपालिका व प्रांत ऑफिसकडून नियमाप्रमाणे रितसर परवानगी घेण्याची जबाबदारी माझी राहील व ती मी पार पाडीन.

४. स्वयंपाकास लागणारी सर्व प्रकारची भांडी व उपकरणे मी स्वतःची वापरेन. मेस मधील वीजेची उपकरणे जसे की पंखे, कुलर इ. च्या दुरूसतीचा खर्च मी स्वतः करेन. दिवे, ट्युबलाईट गेल्यास मी स्वखर्चाने बसवेन. मेसमधील स्वतःच्या मालकीच्या सर्व वस्तूची जबाबदारी माझी असेन वस्तू गहाळ झाल्यास त्याची भरपाई करून देईन.

५. मेस चालवितांना मेस शुल्क विद्यार्थीनीकडून वसूल करण्याची जबाबदारी माझी/माझेवरच राहील.

६. मेसमध्ये व इतरत्र माझ्यासाठी काम करणारे सर्व कर्मचारी निरोगी व निर्व्यसनी असतील. मी कोणताही बाल कामगार ठेवणार नाही. मेसरुम, स्वयंपाकघर व माझ्या वापरातील आजूबाजूचा परिसर हा सतत स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मी घेईन. व ते काम माझ्या कामगारांकडून प्रतिदिनी करुन घेईन.

७. मेसमधील कामगारांचे आरोग्य चांगले राहील याची मी दक्षता घेईन.

८. विद्यार्थीच्या जेवणाच्या वेळा खालीलप्रमाणे ठरविण्यांत येत आहेत. त्या मला मान्य आहेत.

| | |
|---|---|
| **सकाळचा चहा** | **सकाळी ६.०० पासून सुरू** |
| **सकाळचा नाश्ता** | **सकाळी ७.०० ते सकाळी ८.३०** |
| **सकाळचे जेवण** | **सकाळी १०.०० ते दुपारी २.००** |
| **सायंकाळचा चहा** | **दुपारी ४.०० ते सायं. ५.००** |
| **रात्रीचे जेवण** | **सायं. ७.३० ते रात्री ९.००** |

...२...

९. वसतीगृहातील मुलींना मी दोन वेळचे पुरेसे शाकाहारी जेवण देईन. तसेच सकाळी नाष्टा व दोन वेळी चहा त्यापोटी दरमहा **रु. २,७००/—(रू. दोन हजार सातशे फक्त)** मात्र प्रती विद्यार्थीनी दर आपण ठरवून दिल्याप्रमाणे आकारेन.

१०.जेवणाचा आठवडयाचा मेनू होस्टेल समिती ठरवून देईल त्याप्रमाणे त्याची मी अंमलबजावणी करेन.

११.कोणत्याही विद्यार्थीनीबदद्ल तक्रार निर्माण झाल्यास त्याबदद्ल संबंधित विद्यार्थ्यास काहीही न बोलता माझी लेखी तक्रार होस्टेल सुपरवायझरकडे मी देईन. सुपरवायझर यांनी सदरची तक्रार होस्टेल समितीच्या सभेमध्ये मांडून त्याचे जे निराकरण होईल, ते मला मान्य राहील.

१२.जेवणासाठी चांगल्या प्रतीचे धान्य, तेल व भाजीमाला यांचा वापर करीन. मेस करिता लागणारे धान्य तांदुळ, खाद्यतेल इत्यादी रेशनिंगचे मुळीच वापरणार नाही. ते धान्य निवडून स्वच्छ करुन वापरेन व चपातीसाठी चांगल्याप्रतीचा गहू वापरेन, तयार आटा वापरणार नाही. जेवणाची गुणवत्ता ही कायम स्वरुपी चांगली ठेवीन व गुणवत्तेमध्ये घसरण झाल्यास सदरहू करार रद्द केला जाईल व त्याचे सर्व अधिकार होस्टेल समितीस असतील याची मला जाणीव आहे.

१३.रोजच्या जेवणामधून राहिलेले तसेच खराब झालेले अन्न पुन्हा वापरले जाणार नाही. आपण सूचित कराल त्याठिकाणच्या खडड्यातच टाकले जाईल.

१४.वरील मेसमध्ये फक्त शाकाहारी पदार्थ शिजविले जातील व दिले जातील. तेथे अंडयाचा वा इतर अखाद्य (मांसाहारी) पदार्थांचा वापर बिलकूल केला जाणार नाही.

१५.संस्थेच्या होस्टेल कमिटी सदस्य, प्राचार्य किंवा प्रतिनिधी यांना वेळोवेळी आवश्यक बाबींची तपासणी करण्याचा अधिकार मला मान्य आहे व याकामी मी त्यांना सर्व आवश्यक सहकार्य करेन.

१६.वरील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास करार रद्द केला जाईल तसेच डिपॉझीट जप्त केले जाईल हे मला मान्य आहे.

१७.मेसमध्ये माझे कर्मचाऱ्यांसह बिडी, सिगारेट, तंबाखू, मावा, मद्यपान, अल्कोहोल व नशीले पदार्थ वा तत्सम पदार्थ विकले जाणार नाहीत व सेवन करु दिले जाणार नाही.

१८.मला मेस चालविण्याचा केवळ परवाना आहे त्यान्वये जागेवर वा होस्टेलच्या कोणताही भागावर माझा कोणताही हक्क हितसंबंध वा भाडेकरूंचा हक्क नाही.

...३...

ालविण्याचा परवाना मला तबदील करण्याचा हक्क नाही. मी स्वत: मेस चालवेन व ती कोणामार्फत वा कोणासही पोट कराराने देणार नाही. संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यांत येणारे अटी, सूचना मला मान्य असतील. संस्था कोणत्याही वेळी हा करार रद्द करू शकते हे मला मान्य आहे. वरील सर्व अटी मला मान्य असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

२०. मी चालवित असलेल्या मेस मधील बेसीन स्वच्छता आणि मेस मधून बाहेर जाणारे ड्रेनेज स्वच्छता ही सर्वस्वीपणे माझ्याच स्वखर्चाने करेन. ड्रेनेजची सर्व पाईप लाईन मोठया आकाराची असून त्यात कोणत्याही प्रकारचे अन्न किंवा खरकटे टाकले नाही. तर ती ड्रेनेज लाईन चोकअप होत नाही. तरी ड्रेनेज मध्ये माझ्या मेस मधून अन्न किंवा खरकटे जाणार नाही याची मी काळजी घेईन. आणि जरी ड्रेनेजची पाईप लाईन चोकअप झाल्यास ती स्वखर्चाने ड्रेनेज पाईप लाईन स्वच्छ करून घेईन. अशी हमी देतो.

वरील प्रमाणे सर्व अटी मला मान्य आहेत.

ठिकाण :– बारामती

दिनांक :– १०/०६/२०२३

करारनामा लिहून घेणार
**श्री.मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर),**
**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

करारनामा लिहून देणार
**श्री. भंवरलाल कन्हैयालाल गौड**
**बारामती**



**साक्षीदार**

१. श्री.व्ही.डी.महामुनी

२. श्री.ए.बी.वणवे

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ 53AA 442453

अनुक्रमांक 9232 दिनांक 02/05/2023 रुपये 100/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे ......

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुच्छेद क्र. ......

मुद्रांक वापरणाराचे संपुर्ण नाव क्वालिटी केटरर्स

संपुर्ण पत्ता बारामती जि. पुणे

हस्ते व्यक्तीचे संपुर्ण नाव वैभव शिवाजीराव जगताप

पत्ता बारामती जि. पुणे

स्वाक्षरी

श्री.ग.कृ.जवंजाळ

मुद्रांक विक्रेता परवाना क्रमांक-२२०३००१

पत्ता - बारामती परवान्याची मुदत ३१/३/२०२४

उप कोषागार कार्यालय बारामती
23 MAY 2023
उप कोषागार अधिकारी
बारामती

# क रा र ना मा

## विद्यार्थी वसतिगृह मेस चालविण्याचा कराररनामा

**मा.श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर)**
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, करार लिहून घेणार
बारामती, जि.पुणे

**श्री. वैभव शिवाजीराव जगताप**
क्वालिटी केटरर्स, बारामती, ता. बारामती करार लिहून देणार
जि. पुणे

कारणे करारनामा लिहून देतो की, बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या मुलांचे वसतीगृहातील मेस विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी चालविण्याकरिता मी मागणी केल्यावरुन खालील अटींवर आपण मला ती देत आहात. त्या अटी पुढीलप्रमाणे आहेत व त्या मला मान्य आहेत.

१. **सदर मेस दि. ०१/०७/२०२३ ते ३१/०५/२०२४ अखेर (म्हणजेच ११ महिन्यांकरिता) चालविण्यांस दिलेली आहे.**

२. सदर मुदतीकरिता जागा भाडे विद्यार्थी मेस दरमहा रु. २०,०००/—(रुपये वीस हजार फक्त) ठरले आहे. भाडे त्याच महिन्याच्या सात तारखेपर्यंत संस्थेकडे जमा करावयाचे आहे. तसेच प्रत्यक्ष येणारे लाईट बील मी स्वत: भरेन. डिपॉझिट रू ५०,०००/— (अक्षरी रू. पन्नास हजार फक्त) या पूर्वी संस्थेकडे जमा केले आहे. पाणी पुरवठयाबाबत वार्षिक रू.२०००/— संस्थेकडे जमा करेन..

३. मेस चालू करण्यापूर्वी मी व्यवसाय नोंदणी, नगरपालिका व प्रांत ऑफिसकडून नियमाप्रमाणे रितसर परवानगी घेण्याची जबाबदारी माझी राहील व ती मी पार पाडीन.

४. स्वयंपाकास लागणारी सर्व प्रकारची भांडी व उपकरणे मी स्वत:ची वापरेन. मेस मधील वीजेची उपकरणे जसे की पंखे, कुलर इ. च्या दुरूस्तीचा खर्च मी स्वत: करेन. दिवे, ट्युबलाईट गेल्यास मी स्वखर्चाने बसवेन. मेसमधील स्वत:च्या मालकीच्या सर्व वस्तूची जबाबदारी माझी असेन वस्तू गहाळ झाल्यास त्याची भरपाई करून देईन.

५. मेस चालवितांना मेस शुल्क विद्यार्थीनीकडून वसूल करण्याची जबाबदारी माझी/माझेवरच राहील.

६. मेसमध्ये व इतरत्र माझ्यासाठी काम करणारे सर्व कर्मचारी निरोगी व निर्व्यसनी असतील. मी कोणताही बाल कामगार ठेवणार नाही. मेसरुम, स्वयंपाकघर व माझ्या वापरातील आजूबाजूचा परिसर हा सतत स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मी घेईन. व ते काम माझ्या कामगारांकडून प्रतिदिनी करुन घेईन.

७. मेसमधील कामगारांचे आरोग्य चांगले राहील याची मी दक्षता घेईन.

८. विद्यार्थांच्या जेवणाच्या वेळा खालीलप्रमाणे ठरविण्यांत येत आहेत. त्या मला मान्य आहेत.

| | |
|---|---|
| सकाळचा चहा | **सकाळी ६.०० पासून सुरू** |
| सकाळचा नाश्ता | **सकाळी ७.०० ते सकाळी ८.३०** |
| सकाळचे जेवण | **सकाळी १०.०० ते दुपारी २.००** |
| सायंकाळचा चहा | **दुपारी ४.०० ते सायं. ५.००** |
| रात्रीचे जेवण | **सायं. ७.३० ते रात्री ९.००** |

९. वसतीगृहातील मुलींना मी दोन वेळचे पुरेसे शाकाहारी जेवण देईन. त्यापोटी दरमहा **रु. २,७००/—(रू. दोन हजार सातशे फक्त)** मात्र प्रती विद्यार्थी दर आपण ठरवून दिल्याप्रमाणे आकारेन. मुलांचे जेवणाचे खाडे ८ दिवसांचे जास्त झाल्यास खाडयाचे दिवस पुढील ३० दिवसांमध्ये समायोजन करून देईन.

१०. जेवणाचा आठवडयाचा मेनू होस्टेल समिती ठरवून देईल त्याप्रमाणे त्याची मी अंमलबजावणी करेन.

११. कोणत्याही विद्यार्थ्यांबदद्ल तक्रार निर्माण झाल्यास त्याबदद्ल संबंधित विद्यार्थ्यास काहीही न बोलता माझी लेखी तक्रार होस्टेल सुपरवायझरकडे मी देईन. सुपरवायझर यांनी सदरची तक्रार होस्टेल समितीच्या सभेमध्ये मांडून त्याचे जे निराकरण होईल, ते मला मान्य राहील.

१२. जेवणासाठी चांगल्या प्रतीचे धान्य, तेल व भाजीपाला यांचा वापर करीन. मेस करिता लागणारे धान्य तांदुळ, खाद्यतेल इत्यादी रेशनिंगचे मुळीच वापरणार नाही. ते धान्य निवडून स्वच्छ करुन वापरेन व चपातीसाठी चांगल्याप्रतीचा गहू वापरेन, तयार आटा वापरणार नाही. जेवणाची गुणवत्ता ही कायम स्वरुपी चांगली ठेवीन व गुणवत्तेमध्ये घसरण झाल्यास सदरहू करार रद्द केला जाईल व त्याचे सर्व अधिकार होस्टेल समितीस असतील याची मला जाणीव आहे.

१३. रोजच्या जेवणामधून राहिलेले तसेच खराब झालेले अन्न पुन्हा वापरले जाणार नाही. आपण सूचित कराल त्याठिकाणच्या खडड्यातच टाकले जाईल.

१४. वरील मेसमध्ये फक्त शाकाहारी पदार्थ शिजविले जातील व दिले जातील. तेथे अंडयाचा वा इतर अखाद्य (मांसाहारी) पदार्थांचा वापर बिलकूल केला जाणार नाही.

१५. संस्थेच्या होस्टेल कमिटी सदस्य, प्राचार्य किंवा प्रतिनिधी यांना वेळोवेळी आवश्यक बाबींची तपासणी करण्याचा अधिकार मला मान्य आहे व याकामी मी त्यांना सर्व आवश्यक सहकार्य करेन.

१६. वरील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास करार रद्द केला जाईल तसेच डिपॉझीट जप्त केले जाईल हे मला मान्य आहे.

१७. मेसमध्ये माझे कर्मचाऱ्यांसह बिडी, सिगारेट, तंबाखू, मावा, मद्यपान, अल्कोहोल व नशीले पदार्थ वा तत्सम पदार्थ विकले जाणार नाहीत व सेवन करु दिले जाणार नाही.

१८. मला मेस चालविण्याचा केवळ परवाना आहे त्यान्वये जागेवर वा होस्टेलच्या कोणताही भागावर माझा कोणताही हक्क हितसंबंध वा भाडेकरूंचा हक्क नाही.

For MPVS

लविण्याचा परवाना मला तबदील करण्याचा हक्क नाही. मी स्वत: मेस चालवेन व ती णामार्फत वा कोणासही पोट कराराने देणार नाही. संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यांत येणारे नियम, अटी, सूचना मला मान्य असतील. संस्था कोणत्याही वेळी हा करार रद्द करू शकते हे मला मान्य आहे. वरील सर्व अटी मला मान्य असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

२०. मी चालवित असलेल्या मेस मधील बेसीन स्वच्छता आणि मेस मधून बाहेर जाणारे ड्रेनेज स्वच्छता ही सर्वस्वीपणे माझ्याच स्वखर्चाने करेन. ड्रेनेजची सर्व पाईप लाईन मोठया आकाराची असून त्यात कोणत्याही प्रकारचे अन्न किंवा खरकटे टाकले नाही. तर ती ड्रेनेज लाईन चोकअप होत नाही. तरी ड्रेनेज मध्ये माझ्या मेस मधून अन्न किंवा खरकटे जाणार नाही याची मी काळजी घेईन. आणि जरी ड्रेनेजची पाईप लाईन चोकअप झाल्यास ती स्वखर्चाने ड्रेनेज पाईप लाईन स्वच्छ करून घेईन. अशी हमी देतो.

वरील प्रमाणे सर्व अटी मला मान्य आहेत.



ठिकाण :– बारामती

दिनांक :– १०/०६/२०२३

करारनामा लिहून घेणार
**श्री.मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर),**
**सचिव**
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

करारनामा लिहून देणार
**श्री. वैभव शिवाजीराव जगताप**
बारामती

**साक्षीदार**

१. श्री.व्ही.डी.महामुनी

२. श्री.ए.बी.वणवे

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2023 ◐ 71AA 987809

अनुक्रमांक ६०४८ दिनांक 28/11/23 रुपये १००/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे 5(12)

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुच्छेद क्रं.

मुद्रांक वापरणाराचे संपुर्ण नांव अजित लेबर ॲण्ड सिक्युरिटी

संपुर्ण पत्ता एमआयडीसी बारामती

हस्ते व्यक्तीचे संपुर्ण नांव

पत्ता

मुद्रांक धारकाची/हस्ते व्यक्तीची सही — साक्षरी H.G. Bhosale

हेमलता गणपत भोसले,
मुद्रांक विक्रेता, परवाना क्रमांक

उपकोषागार अधिकारी बारामती 23 OCT 2023

## संस्थेमध्ये सिक्युरिटी सर्व्हिसेस पुरविणे संदर्भात करारनामा

**मा.श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर)**
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि.पुणे — करार लिहून घेणार

व

**अजित लेबर ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस,**
अजित दिपक कांबळे,
गेट नं.३ दिपमंगल हेल्थ केअर,
बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क,
एमआयडीसी, बारामती, जि.पुणे ४१३१३३
मो.नं. ९६८९७०३९३९ / ९६८९९७३९३९ — करार लिहून देणार

P.T.O.

आपण दिलेल्या ऑर्डर प्रमाणे मी **अजित लेबर ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस्,** गेट नं.३ दिपमंगल हेल्थ केअर, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, एमआयडीसी, बारामती, जि.पुणे **आपल्या संस्थेतील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व मुलींचे वसतिगृहसाठी सिक्युरिटी गार्ड** पुरविणेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारलेली आहे. तसेच आपल्या ऑर्डर प्रमाणे **दि.०१/१२/२०२३ ते ३१/०५/२०२४** या कालावधीत सिक्युरिटी सर्व्हिस पुरविणेबाबत करार करीत आहे. प्रति सिक्युरिटी गार्ड १२ तास ड्यटीसाठी प्रति माह रू १७,३००/- प्रमाणे आम्हाला मंजूर आहे.

१) सभेमध्ये ठरल्याप्रमाणे आपण १५ सिक्युरिटी गार्डची नावे व कागदपत्र कार्यालयात जमा करीन, जेणेकरून ऑर्डर प्रमाणे आपण ७ सिक्युरिटी गार्डस् पैकी एखादा सिक्युरिटी गार्ड गैरहजर असल्यास बदली गार्ड आपण दिलेल्या १५ सिक्युरिटी गार्डपैकीच देईन. जर त्यांच्यात काही त्रुटी आढल्यास आपणांस कोणतीही सूचना न देता सदरील दिवसाचा पगार कपात करण्यात माझी कोणतीही हरकत नाही.

२) मी जे सिक्युरिटी गार्ड नेमणुक करणार आहे, त्या सगळ्या सिक्युरिटी गार्डचे पोलिस व्हेरीफिकेशन, मेडिकल चेकअप करून सदरील कागदपत्र कार्यालयात जमा करेल.

३) आमचा सिक्युरीटी गार्ड हा ३० ते ४५ या वयोगटामधील असणार आहे.

४) सिक्युरिटी गार्ड म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचा ई.पी.एफ. भरल्याची स्लिप दर महिन्याच्या बीलसोबत जोडून देईन.

५) संस्थेचे महाविद्यालय व वसतिगृहाची संपूर्ण सुरक्षा पुरविणेची जबाबदारी माझी राहील.

६) महाविद्यालयातील भांडणतंटे, मारामाऱ्या, पोलिस स्टेशनची सर्व प्रकरणांची सर्वस्वी जबाबदारी अजित लेबर ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस् म्हणून आमची राहील.

७) वरील कामात माझ्याकडून कोणतीही त्रुटी आढळल्यास तातडीने करार संपविण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवलेला असल्याने त्यास आमची काहीही हरकत नाही.

वरील प्रमाणे सर्व अटी मला मान्य आहेत.

ठिकाण :- बारामती
दिनांक :- २८/११/२०२३

करारनामा लिहून घेणार
**श्री.मिलिंद राजकुमार शाह (वाघोलीकर)**
सचिव
अनेकान्त एज्युकेशन सोसायटी
बारामती

करारनामा लिहून देणार
**अजित लेबर ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हिसेस्, करिता**
अजित दिपक कांबळे, गेट नं.३ दिपमंगल हेल्थ केअर, बारामती हायटेक टेक्सटाईल पार्क, एमआयडीसी, बारामती, जि.पुणे



**साक्षीदार**

**१) श्री.व्ही.डी. महामुनी**
२) **श्री.ए.बी. वणवे**

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ 53AA 483918

अनुक्रमांक ३२८२ दिनांक १/५/२३ रुपये १,००१/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी खरेदी करायचा आहे.... ५२१२

मुंबई मुद्रांक अधिनियम,१९५८ चे अनुच्छेद क्रं.............

मुद्रांक खरेदी करणाऱ्याचे संपूर्ण नांव [illegible]

संपूर्ण पत्ता ........................ बारामती

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता ........................ २३५

पत्ता ........................

मुद्रांक धारकाची/हस्ते व्यक्तीची सही स्वाक्षरी

सौ. उषा हनुमंत [illegible]

मुद्रांक विक्रेता परवाना क्रमांक -२२० [illegible]

[illegible] करारनामा

16 MAY 2023

## उपहारगृह (कॅन्टीन) चालविण्याचा परवानगीचा करार

**मा.श्री. मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर)**
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि.पुणे

करार लिहून घेणार

**श्री. योगेश रमेश भळगट**
सिध्दनाम बिल्डींग भिगवन रोड,
बारामती, ता. बारामती
जि. पुणे

करार लिहून देणार

...२...

कारणे करारनामा लिहून देतो की, बारामती येथील अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारातील प्रेरणा भवन येथील उपहारगृह (कॅन्टीन) चालविण्याकरिता मी मागणी केल्यावरुन खालील अटींवर आपण मला उपहारगृह (कॅन्टीन) चालविणेस देत आहात. त्या अटी पुढीलप्रमाणे आहेत व त्या मला मान्य आहेत.

१. **सदर उपहारगृह दि. ०१/०७/२०२३ ते ३१/०५/२०२४ अखेर (म्हणजेच ११ महिन्यांकरिता) चालविण्यांस दिलेली आहे.**

२. सदर मुदतीकरिता जागा भाडे दरमहा रु. ३०,०००/—(रुपये तीस हजार फक्त) त्याच महिन्याच्या सात तारखेपर्यंत भरेन. डिपॉझिट रू २,००,०००/— (अक्षरी रू. दोन लाख फक्त) व्यवसाय सुरू करण्यापूर्वी भरेन. तसेच प्रत्यक्ष येणारे लाईट बीलाची रक्कम मी स्वत: भरणा करेन.

३. उपहारगृह चालू करण्यापूर्वी मी व्यवसाय नोंदणी, नगरपालिका व प्रांत ऑफिसकडून नियमाप्रमाणे रितसर परवानगी घेण्याची जबाबदारी माझी राहील व ती मी पार पाडीन.

४. स्वयंपाकास लागणारी सर्व प्रकारची भांडी व उपकरणे मी स्वत:ची वापरेन. मेस मधील वीजेची उपकरणे जसे की पंखे, कुलर इ. च्या दुरूसतीचा खर्च मी स्वत: करेन. दिवे, ट्युबलाईट गेल्यास मी स्वखर्चाने बसवेन. मेसमधील स्वत:च्या मालकीच्या सर्व वस्तूची जबाबदारी माझी असेन वस्तू गहाळ झाल्यास त्याची भरपाई करून देईन.

५. उपहारगृह चालवितांना शुल्क (बीलाची) आर्थिक देणे—येणे संबंधी सर्व जुबाबदारी माझी/माझेवरच राहील.

६. उपहारगृह मध्ये व इतरत्र माझ्यासाठी काम करणारे सर्व कर्मचारी निरोगी व निर्व्यसनी असतील. मी कोणताही बाल कामगार ठेवणार नाही. उपहारगृहामधील कामगारानां संस्था ठरवेल तो गणवेश मी स्वखर्चाने देईन. त्याचप्रमाणे उपहारगृहामील कामगारची नावे पत्ता फोटो इ. माहिती मी आपल्या कार्यालयात जमा करेन.

७. उपहारगृह व माझ्या वापरातील आजूबाजूचा परिसर हा सतत स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मी घेईन. व ते काम माझ्या कामगारांकडून प्रतिदिनी करुन घेईन.

८. उपहारगृहामधील कामगारांचे आवश्यक ते मेडिकल फिटनेस प्रमाणपत्र दर तीन महिन्यानी घेईन व रितसर आपणाकडे सादर करेन. व कामगाराचे आरोग्य चांगले राहील याची मी दक्षता घेईन.

९. कॅन्टीनचे दर वेळोवेळी संस्थेच्या कॅन्टीन समितीने ठरवून दिल्याप्रमाणे आकारेन करार मुदतीमध्ये परस्पर दर वाढ करणार/मागणार नाही.

१०. कॅन्टीन समिती शिफारस करेल त्याप्रमाणे पदार्थ उपलब्ध करेन. त्याबद्दल काही तक्रार असल्यास कोणत्याही बदलापूर्वी कॅन्टीन समिती कडून परवानगी घेईन.

...२...

Bhalgat

११.पदार्थाबद्दल वा अन्य तक्रारी आल्यास कॅन्टीन समिती त्याचा विचार करून जो निर्णय घेईन त्या मला बंधनकारक असेल.

१२.खाद्य पदार्थासाठी चांगल्या प्रतीचे धान्य, तेल व भाजीपाला यांचा वापर करीन. कॅन्टीनकरिता लागणारे मटेरिअल चांगल्या प्रतीचे वापरेन. धान्य, खाद्यतेल इत्यादी रेशनिंगचे मुळीच वापरणार नाही. कॅन्टीनमधील पदार्थांची गुणवत्ता ही कायम स्वरुपी चांगली ठेवीन व गुणवत्तेमध्ये घसरण झाल्यास सदरहू करार रद्द केला जाईल व त्याचे सर्व अधिकार सचिव/वसतिगृह समितीस असतील याची मला जाणीव आहे.

१३.रोजच्या पदार्थामधून राहिलेले तसेच खराब झालेले अन्नपदार्थ पुन्हा वापरले जाणार नाही. आपण सूचित कराल त्याठिकाणच्या खडड्यातच टाकले जाईल/नगरपरिषदेच्या कचरा गोळा करण्याच्या घंटा गाडीत दिले जाईल.

१४.वरील कॅन्टीनमध्ये फक्त शाकाहारी पदार्थ शिजविले जातील व दिले जातील. तेथे अंडयाचा वा इतर अखाद्य (मांसाहारी) पदार्थांचा वापर बिलकूल केला जाणार नाही.

१५.संस्थेच्या सचिव/ वसतिगृह समित्ती सदस्य, प्राचार्य किंवा प्रतिनिधी यांना वेळोवेळी आवश्यक बाबींचीतपासणी करण्याचा अधिकार मला मान्य आहे व याकामी मी त्यांना सर्व आवश्यक सहकार्य करेन.

१६.वरील कोणत्याही शर्तींचा भंग केल्यास करार रद्द केला जाईल तसेच डिपॉझीट जप्त केले जाईल हे मला मान्य आहे.

१७.कॅन्टीनमध्ये माझे कर्मचाऱ्यांसह बिडी, सिगारेट, तंबाखू, मावा, मद्यपान, अल्कोहोल व नशीले पदार्थ वा तत्सम पदार्थ विकले जाणार नाहीत व सेवन करु दिले जाणार नाही.

१८.मला कॅन्टीन चालविण्याचा केवळ परवाना आहे त्यान्वये जागेवर वा त्याच्या कोणताही भागावर माझा कोणताही हक्क हितसंबंध वा भाडेकरूंचा हक्क नाही.

**१९.कॅन्टीन चालविण्याचा परवाना मला तबदील करण्याचा हक्क नाही. मी स्वत: कॅन्टीन चालवेन व ते अन्य कोणामार्फत वा कोणासही पोट कराराने देणार नाही. संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यांत येणारे नियम, अटी, सूचना मला मान्य असतील. संस्था कोणत्याही वेळी हा करार रद्द करू शकते हे मला मान्य आहे. वरील सर्व अटी मला मान्य असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.**

...३...

Bhalgat

मी चालवित असलेल्या कॅन्टीन मधील बेसीन स्वच्छता आणि कॅन्टीन मधून बाहेर जाणारे ड्रेनेज स्वच्छता ही सर्वस्वीपणे माझ्याच स्वखर्चाने करेन. ड्रेनेजची सर्व पाईप लाईन मोठया आकाराची असून त्यात कोणत्याही प्रकारचे अन्न किंवा खरकटे टाकले नाही. तर ती ड्रेनेज लाईन चोकअप होत नाही. तरी ड्रेनेज मध्ये माझ्या कॅन्टीन मधून अन्न किंवा खरकटे जाणार नाही याची मी काळजी घेईन. आणि जरी ड्रेनेजची पाईप लाईन चोकअप झाल्यास ती स्वखर्चाने ड्रेनेज पाईप लाईन स्वच्छ करून घेईन. अशी हमी देतो.

वरील प्रमाणे सर्व अटी मला मान्य आहेत.

ठिकाण :– बारामती

दिनांक :– १०/०६/२०२३

करारनामा लिहून घेणार
**श्री.मिलिंद राजकुमार शहा (वाघोलीकर),**
**सचिव**
अनेकान्त **एज्युकेशन** सोसायटी, बारामती

करारनामा लिहून देणार
**श्री. योगेश रमेश भळगट**
सिध्दनाम बिल्डींग, भिगवन रोड,
बारामती



**साक्षीदार**

१. श्री.व्ही.डी.महामुनी

२. श्री.ए.बी.वणवे